Shri Swami Vivekanand Bahu Uddeshiya Vikas Mandal's
**Shivjagruti Senior College, Nalegaon**
Tq. Chakur, Dist. Latur - 413524 (M.S.)
In Collaboration with
Indian Council of Social Science Research, Mumbai &
Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

One Day Interdisciplinary National Seminar on
**Research Methodology in Social Sciences and New Trends**
22nd August 2018

---

## PROCEEDINGS BOOK OF NATIONAL SEMINAR

# संशोधन पद्धती

## Research Methodology

डॉ.संजय वाघमारे
(प्राचार्य)

डॉ.ओमशिवा लिगाडे
(समन्वयक)

**संपादक**

प्रा.अमोल पगार
डॉ.लहू वाघमारे
डॉ.विनोद सोनवणे
डॉ.अरविंद कदम
डॉ.चंद्रशेखर ढोले
प्रा.रामराव चव्हाण

---

अरुणा प्रकाशन,
लातूर

PROCEEDINGS BOOK OF NATIONAL SEMINAR
संशोधन पद्धती (Research Methodology)
संपादक - प्रा.अमोल पगार, डॉ.लहू वाघमारे, डॉ.विनोद सोनवणे
डॉ.अरविंद कदम, डॉ.चंद्रशेखर ढोले, प्रा.रामराव चव्हाण

ISBN 978-93-5240-186-4

अरुणा प्रकाशन
१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७

© सर्व हक्क लेखकाधीन

: प्रथम आवृत्ती :- २२ ऑगस्ट २०१८

: मुद्रक : आर्टो ऑफसेट, लातूर

अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्यूटर, लातूर

मुखपृष्ठ रेखाटन :- विरु गुळवे ८६००८८११२७

मूल्य : ५००.०० रुपये

*"संशोधन पद्धती" या प्रोसेडींग बूक मधील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांचे असून त्यास संपादक, प्रकाशन, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

११५. तथ्य संकलनाच्या पध्दती ............ ४६८
प्रा. खोकले आर.के.

116. Research Report Writing in Social Sciences ............ ४७३
Dr. Mukesh J. Kulkarni

११७. सामाजिक संशोधनात संकल्पनांचे महत्त्व ............ ४७७
कु.गायकवाड सरोज भुजंगराव

118. POSTMODERNISM ............ ४८०
Swati Narsing Potwale

119. The Place of the Literature Review in Research ............ ४८३
Prof. Mane Rajabhau Sidaji

१२०. संशोधन कार्यातील प्रबंध लेखन ............ ४८६
प्रा.डॉ.भुजंग विठ्ठलराव पाटील

१२१. संशोधनात संगणकाचा उपयोग ............ ४८८
प्रा.डॉ.शिवराज रामराव पाटील

122. "Concept of Webliography, Citation Index, Impact Factor and Social Science Research" ............ ४९०
Vishwambar Dharma Gaikwad

१२३. संशोधनातील सर्वेक्षण ............ ४९४
शेख रशिदा रहेमतुल्ला

१२४. सामाजिक संशोधनात संशोधन आराखड्याची आवश्यक्ता ............ ४९८
प्रा. बळीराम वसंतराव पवार

१२५. सामाजिक संशोधनातील गृहितकृत्य पद्धती - एक अभ्यास ............ ५०१
कु.पाटील सुलक्षणा भारत

126. Research Methodology In Geography ............ ५०५
Dr. Laggad Pradip P.

१२७. संशोधन आराखडा ............ ५०९
प्रा. डॉ. के.के. पाटील, सतिश दिलीपराव तोडकर

१२८. समाज शास्त्रीय संशोधनातील संगणक व माहिती तंत्रज्ञानाचे महत्व ............ ५१३
प्रा.डॉ.जाधव अशोक काकासाहेब

129. RESEARCH METHODOLOGY IN SOCIAL RESEARCH ......... ५१६
Dr. S.D. Sawant

१३०. [illegible] गृहीतकृत्याचे महत्व व उपयोगिता ............ ५१९
[illegible]

# १२८.

# समाज शास्त्रीय संशोधनातील संगणक व माहिती तंत्रज्ञानाचे महत्व

**प्रा.डॉ.जाधव अशोक काकासाहेब**
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ जि. परभणी

**प्रस्तावना :-** २१ व्या शतकात संगणक, लॅपटॉप, मोबाईल आणि दुरदर्शन हे परवलीचे शब्द बनलेले आहेत. कोणतीही व्यक्ती आता या साधनाशिवाय आपले शैक्षणिक कार्य करू शकत नाही. याला माहिती तंत्रज्ञान असेही म्हटले जाते. आधुनिक काळात सामाजिक शास्त्राचा संशोधनातील संगणक हा एक अविभाज्य घटक बनलेला आहे. त्याद्वारे संशोधनातील अनेक सांख्यिकीय प्रक्रिया जलद व सोप्या पध्दतीने केल्या जातात. जसे, तथ्य संकलन, तथ्य, विश्लेषण, आलेख, चित्र व नकाशे काढणे इत्यादी कार्य सहजपणे करता येतात. प्रथमत: संशोधकाने संगणक, लॅपटॉप व त्याच्याशी सलग्नित जसे ईमेल, इंटरनेट, पेन्ड्राईव्ह, हार्डडिस्क, विविध सॉफ्टवेअर इ. चे ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. परंतू बहुतांश संशोधकाना ते ज्ञान अवगत नसल्याचे दिसून येते. संशोधकाला संशोधनाशी संबंधित हवी असलेली माहिती तात्काळ मिळण्यास मदत होते. विषयाशी निगडीत वेबसाईटवर टाईप केले असता टाईप केलेल्या शब्दाशी संबंधित तात्काळ माहिती मिळते. छापील स्वरूपात मिळालेली माहिती वेळ खाऊ असते. ती अधिक कालावधीसाठी जतन करून ठेवणे कठिण वाटते. पोस्टाद्वारे माहिती लवकर किंवा वेळेवर उपलब्ध होईलच याची शाश्वती नसते. परंतू इंटरनेट, वेबसाईट व ईमेलद्वारा हवी ती माहिती किंवा तथ्ये तात्काळ संकलित करता येतात व ती माहिती कितीही कालावधीसाठी संशोधक संगणक किंवा पेन्ड्राईव्हमध्ये जतन करून ठेवू शकतो व त्यावर केंव्हाही प्रक्रिया करू शकतो. एवढेच नव्हे तर माहिती तंत्रज्ञानामुळे संशोधनाशी संबंधित मुलाखती सुध्दा ऑनलाईन पध्दतीने घेता येतात.

अलिकडे महाविद्यालयीन व शालेय स्तरावर पॉवर पॉईंट प्रझेंटेशन सारख्या माध्यमांचा अध्यापनात वापर करावा असे शासनाचे संकेत आहेत. चित्र, आकृती रूपाने माहितीची व्यवस्थित मांडणी करता येते. पी.पी.टी. चे ज्ञान आत्मसात असणारा शिक्षकच आपल्या क्षेत्रात नाव लौकीक करू शकेल तसेच विद्यार्थ्यांचे समाधान करू शकेल. त्यामुळे संशोधक, प्राध्यापक व शिक्षक यांना संगणकाशी संबंधित सर्व संसाधनाचे ज्ञान असणे काळाची गरज आहे.

**संशोधनाचा अर्थ :** मानव हा बुध्दीजिवी असल्यामुळे त्याला सर्व घटनांची कारणमिमांसा जाणून घ्यावी वाटते. मानवाची जिज्ञासा हाच संशोधनाचा मुख्य आधार आहे. तसेच समाजामध्ये घडणाऱ्या विविध घटनांची मानव कारणमिमांसा जाणून घेवू इच्छित असतो. याला अनुसरून पॉवलिन यंग च्या मते, क्रमबध्दता, अंतर्गत परस्पर संबंध, स्पष्टीकरण आणि नैसर्गिक नियमाद्वारे नवीन तथ्ये शोधण्याची किंवा जुन्या तथ्यांची पडताळणी घेण्याची सामाजिक संशोधन ही एक शास्त्रीय आधार असणारी पध्दत आहे. थोडक्यात समाजात घडलेल्या किंवा घडत असलेल्या घटनांची तथ्ये, सामाजिक व्यवहर, त्याचे घटक, कार्यकारण संबंध, नियम, अटी, दृष्टीकोन व नवीन ज्ञान याशी संबंधित असलेल्या सर्व संशोधनाला सामाजिक संशोधन म्हणतात.

**सामाजिक संशोधनात संगणक किंवा माहिती तंत्रज्ञानाचे महत्व :-**

सध्या २१ व्या शतकात संगणक व माहिती तंत्रज्ञानाने मोठी झेप घेतलेली आहे. पृथ्वी, आकाश व विविध ग्रहावरील हालचालीचा शोध घेवून तेथे घडणाऱ्या घटनांची, क्रियांची व तथ्यांची माहिती संगणक व त्याशी संबंधित माहिती तंत्रज्ञानाच्या विविध साधनांद्वारे तथ्य, आकडेवारी संग्रहीत केल्या जातील. ती माहिती किंवा घटना व तथ्य मानवाला हवे तेंव्हा उपलब्ध होतात. या प्रमाणे संशोधक जगातील विविध राष्ट्रातील सामाजिक घटना, व्यवहार, नियम, अटी, सिध्दांत, घटक व कार्यकारण संबंध याचा शोध माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने घेवू शकतो आणि आपले संशोधन कार्य सोपे व सहज करू शकतो. संगणक किंवा माहिती तंत्रज्ञानाचे संशोधनातील महत्व खालील प्रमाणे स्पष्ट करता येते.

**१. वेळ व पैसा बचत :-** संशोधकाला २० व्या शतकात तथ्य संकलनासाठी खुप कष्ट करावे लागत होते. परंतू माहिती तंत्रज्ञानामुळे संशोधनासाठी लागणारी आवश्यक ती तथ्य व माहिती तात्काळ व कमी खर्चात उपलब्ध होत आहे. त्यासाठी संशोधकाकडे संगणक, संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. संगणक हाताळणी व माहिती तंत्रज्ञान अवगत असल्यास संशोधक आपला वेळ व पैसा मोठया प्रमाणात बचत करू शकतो. तसेच आपले संशोधन कार्य वेळेत पूर्ण करू शकतो.

**२. माहितीचे विश्लेषण :-** संशोधक माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आवश्यक ती माहिती संगणकात साठवू शकतो. संगणकाद्वारे संशोधक शोध प्रबंधातील माहितीचे विश्लेषण बिनचुकपणे करू शकतो. तसेच गणितीय, सांख्यिकीय कमांड तसेच नकाशे, आकृत्या, आलेख इत्यादींचे प्रोग्रॅम संगणकात असतात. संगणकाला केवळ संशोधकाने हवे ते आदेश द्यावे लागतात. दिलेल्या आदेशाप्रमाणे संगणक पुरविलेल्या माहितीचे विश्लेषण करित असते. त्यामुळे संशोधन कार्य सोपे बनते.

**३. माहितीची साठवण :-** संशोधक संशोधनाशी निगडीत आवश्यक ती माहिती कितीही प्रमाणात व कितीही दिवसापर्यंत संगणकात किंवा ऑनलाईन पध्दतीने ईमेलमध्ये साठवण ठेवू शकतो. ती माहिती अनेक वर्ष जशास तशी जतनही करता येते. साठवलेल्या माहितीवर हवे तेंव्हा प्रक्रिया करून आपले संशोधन प्रभावीपणे करता येते. तसेच कोणतीही माहिती डाऊनलोड

करता येते व साठवून ठेवता येते.

**४. ऑनलाईन डाटा :-** संशोधकाला विविध प्रकारचे ग्रंथ, संदर्भ, मासीके, पाक्षीके, ध्वनिफिती किंवा चित्रफिती माहिती तंत्रज्ञानामुळे तात्काळ उपलब्ध होण्यास मदत झाली आहे असे अध्यापन साधने मिळवण्यासाठी संशोधकाला एखाद्या दुकानातून किंवा प्रकाशनाकडून तेथे जावून खरेदी करावी लागत होती. परंतू माहिती तंत्रज्ञानामुळे संशोधन सामग्री ऑनलाईन मोफत किंवा खरेदी करू शकतात. यामुळे संशोधकाला संशोधनासाठी अधिक कष्ट करण्याची गरज पडत नाही.

**५. टंकलेखन :-** संगणकामुळे संशोधनाचे टंकलेखन करणे अत्यंत सोपे झालेल आहे. पुर्वीच्या काळात संशोधनाचे कार्य हस्तलिखीत किंवा अलिकडे २० व्या शतकात टाईपराईटरद्वारा करावे लागत होते. परंतू सध्या संगणकाद्वारे संशोधनाचे लेखन सोपे, अचूक व तात्कालीक बनलेले आहे. यामुळे संशोधकाचा वेळ व कष्ट कमी होतात.

**सारांश,** माहिती तंत्रज्ञान संशोधनासाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्याचा वापर योग्य त्या कार्यासाठी होणे आवश्यक आहे. शोधगंगा या सारख्या वेबसाईटमुळे संशोधक दर्जेदार व वेळेत आपले कार्य पुर्ण करू शकत आहे. पृथ्वी व आकाशातील हवी असलेली हवी ती व हवी तेंव्हा माहिती सहजरित्या उपलब्ध होत आहे. अत्याधुनिक लॅपटॉप व मोबाईलमुळे संशोधन कार्य आणखीनच सोपे झालेले आहे. कारण लॅपटॉप व मोबाईलच्या सहाय्याने माहिती साठवून ठेवता येते आणि त्या माहितीवर संशोधक प्रक्रिया करू शकतो. संगणक व लॅपटॉप मध्ये साठवण क्षमताही अधिक असल्यामुळे संशोधकाला कितीही माहिती जतन करून ठेवता येते. थोडक्यात संगणक व माहिती तंत्रज्ञान हे सामाजिक शास्त्राच्याच नव्हे तर कोणत्याही शाखेतील संशोधनासाठी एक प्रकारचे वरदानच आहे असे म्हणावे लागेल.

**संदर्भ :-**


१. डॉ. सुधीर बोधनकर, प्रा.आलोनी विवेक, सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२. प्रा.गंदेवार एस.एन. - समाजशास्त्रीय संशोधन पध्दती, विद्याभारती प्रकाशन, लातूर.
३. डॉ. आगलावे प्रदीप - संशोधन पध्दती शास्त्री व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.
४. डॉ. बोधनकर सुधीर - प्रा. आलोनी विवेक, ॲड. कुलकर्णी मृणाल, सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
५. डॉ. पाटील वा.भा. - संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
६. प्रा.घाटोळे रा.ना. - समाज शास्त्रीय संशोधन - तत्वे व पध्दती, श्री मंगेश प्रकाशन नागपूर.
७. shodhaganga.inflidnent.ac.in.
८. www.networksolutions.com.


❋❋❋